# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

## रामनगर सृष्टी, मिरारोड (पुर्व) ता.जि.ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३२२-२२** **दिनांक २८/१०/२०२२.**

## शेतकऱ्याची फसवणुक करुन पोबारा करणाऱ्या गुन्हेगारास ४८ तासात जेरबंद करुन ५४,४००/- रु. हस्तगत.

## माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २३/१०/२०२२ रोजी फियांदी श्री. केशव नामदेव जगताप, वय ४९ वर्षे, व्यवसाय शेती, रा. मुरळ गांव, ता. निफाड, जि. नाशिक हे दिवाळी सणानिमित्ताने झेंडूची फुले विक्री करण्यासाठी कल्याण येथील फुलमार्केट मध्ये आले होते. त्यावेळी त्यांना एका अनोळखी इसमाने संपर्क साधून फिर्यादीकडील संपुर्ण फुले पाहिजे आहेत असे सांगून फिर्यादींना फुले वसई येथे पोच करावी लागतील असे सांगितल्याने फिर्यादी हे फुले घेवून गुरुदवाराजवळ, अंबाडी रोड, वसई (प) येथे आले.

फिर्यादी यांच्या मालकीची ५४,४००/- रु. किंमतीची झेडुची फुले सदर अनोळखी इसमाने दुसऱ्या गोण्यामध्ये भरुन एका टेम्पो मध्ये टाकून ५ मिनिटामध्ये पैसे आणून देतो असे सांगून फिर्यादी यांना फुलांचा मोबदला रु. ५४,४००/- न देता फिर्यादी यांची फसवणुक करुन पोबारा केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपूर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३८२/२०२२, कलम ४२० भा.दं.वि.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सर्वसामान्य शेतकऱ्याची फसवणुक झाल्याने मा. वरिष्ठांनी आरोपीताचा तात्काळ शोध घेण्याबाबत माणिकपूर पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास सूचना दिल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन प्राप्त माहितीच्या आधारे नमुद गुन्हयातील आरोपी निष्पन्न केला व आरोपी नामे अरविंद सुरसिंग चेकलिया, वय ३२ वर्षे, रा. नालासोपारा (पुर्व) यास ४८ तासात जेरबंद करुन त्याच्याकडून ५४,४००/- रु. हस्तगत केली.

सदरची कामगिरी ही मा. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, मा. श्रीमती पदमजा बडे, स.पो.आ. वसई विभाग यांच्या मार्गदर्शनखाली श्री. संपतराव पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. श्री. सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, प्रकाश कदम, पो.ह. शैलेश पाटील, श्यामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण, पो.अं.कांदे यांनी केलेली आहे.

-------------ooooooooooo-------------